

# जांभळं धुकं

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २४८६

REFBK-0023998
REFBK-0023998

वसंत दीक्षित

संदर्भ वाङ्मय
२८८६
२३९९८
१३।१०।८३

# जांभळं घुकं

वसंत दीक्षित

REFBK-0023998
REFBK-0023998

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४८६
दा. क्र. काव्य २३९९८
१३।१०।८३
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

पारिजात

प्रकाशक :

पारिजात पब्लिकेशन्स्,
ब्लॉक नं. ३
५७६ शिवाजीनगर,
जंगली महाराज रोड,
पुणे ४११ ००४
दूरध्वनी ५२८८१

© सौ. सुलभा दीक्षित

मांडणी : के. विजय अंबाडे

मुखपृष्ठ : अनिल उपळेकर

**किंमत पांच रुपये**

प्रकाशन दिनांक : ३१ मे १९८३

मुद्रक :

एस्. आर. अग्रवाल
ज्ञानसरिता मुद्रणालय
८/११, शामगंगा, एरंडवणे,
पुणे ४११००४.

माझी काव्यात्म वृत्ती ज्यांनी ताजी ठेवली...

माझी पत्नी–सौ. सुलभा

माझी मुले–माधुरी, शतानंद, माधवी, मेधा

माझे कविमित्र–प्रा. वि. रा. जोशी, श्रीधर अंभोरे,

चंद्रकांत पालवे, विलास गिते यांना...

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २४८८६
२३९९९
ता. १३।१०।८३
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

## जांभळं धुकं

जांभळ्या धुक्यातून स्पर्श तरळता
धूसर आता
आठवणींच्या ओल्या प्रतिमा...
असा उधळलो
'जांभळी' नदीच्या काठावरुनी
आंब्याच्या वृक्षाखाली
पुलकित झालो.

पलीकडे शेताच्या बांधावरुनी
धुंद चावरा कधी संथसा वारा...
शुभ्रकपाशी फुटलेली अन्
डुलणाऱ्या धान्याच्या राशी
डोलत ठेवुन डोळ्यांमध्ये
करित न्याहारी

असे उमलले दिवस
उलटल्या नीरव प्रशांत रात्री...
आईचा उबदार हात
कोवळ्या किरणांच्या हाकेने...
गाय घेउनी रानामध्ये
बोरे... अमुन्या खात
आणला गवताचा हिरवा भारा.
अशी पावले होती अनवाणी धावत...

गंमत होती जगण्याच्या अस्तित्वावर
निसर्गातली...
आणि आमुच्या घरात धान्याच्या
फुलले होते क्षण मायेच्या झुबक्याचे
गंधित होते तनुमनांतील श्वासांचे अत्तर
हवेहवेसे आपुलकीचे...

धूसर आता स्पर्श विरळसा येतो केव्हा
जांभळचा धुक्यातुन
आठवणींच्या ओल्या प्रतिमा... !

## घेतले सांभाळुनी

तू अशी होतीस तेव्हा घेतले सांभाळुनी
जीवनाला जाळणारा दाह होता लाल अग्नी
सारे कसे भोवताली तापलेले कोंदणारे
धावुनी आलीस तेव्हा धारेतुनी तू पाझरे

शांतवाया भावनांना उधळिल्या तू भावधारा
अंतरी मायेतल्या तव आभाळला तू निवारा
चांदण्याची ज्योत केली भिजवुनी स्नेहातुनी
अन् कधी कळलेच नाही उमलली किरणांतुनी

मौज गंधाची अशी तू पुलकिता स्पर्शातली
अमृताचे घोट होते डोळे तुझे अन् मधाळी
शिपला सारा जिव्हाळा द्वैत ते ओलांडुनी
तू अशी होतीस तेव्हा घेतले सांभाळुनी...

## यौवनाला गंध सुटला

भेट घडली... घडविली का ?
किलकिले मी दार केले
'कोण ?' म्हटले. स्वर तुझा तो
पूर्विचा तो यौवनाचा
भाव होते भुलविलेले...

चपळता ती, तीच होती
वेग होता... हालचाली
हसत म्हटले, 'कुणिकडे तू ?'
हास्य होते यौवनाचे
'किती वर्षांनी अन् भेट, रे, जहाली...'

नीट होता मांडलेला
जीवनाचा तो पसारा
लाडक्यांच्या गजबजी अन्
निवडलेला जीवनसाथी
मी जाहलो, गे, बावरा... !

बोलली तू काहीबाही
आणि मीही आठवाने
परी नव्हतो... खरे, नव्हतो...
अन् ठिकाणी
तरी होता आठवाला गंध आला

वेळ गेला ... घालवीला...
चहा झाला ... संथ वेळा...
भावनांच्या स्पर्शतेला
परी साक्षात्कार घडला... !
यौवनाला गंध सुटला...!!

## बेसावध

कितो आवेगात आलीस तू
बेसावध होऊन
गंधकळचा कातर बोटांत
धुंदीच्या क्षणांच्या

पाऊलवाट उमटवीत गेलो
शपथेच्या पुळणीवर
दूरवरच्या क्षितिजावर
नजरेच्या अक्षरांनी
लिहिले आश्वासन
मेघांच्या आकृतीत

अंतरीच्या आर्द्रतेने
न्हालो... चिंब झालो
आणि कुठे तरी सळसळ झाली
सावध संस्कारांची ...

आता मात्र अजूनही
डंखाच्या विषखुणा...
तुझा माझा अंतराय
निपचीत पडून आहे
बेसावधतेतल्या
सावध क्षणांवर...

## मैफल

गाण्यात गात जेव्हा विसरून तू स्वतःला
स्वर एक एक जाई फुलवून सौरभाला
आळवुन रागिणीला बेभान दंग भुलुनी
गाण्यात झाड उभवी तू अंग अंग विरुनी
झिरपून आर्द्र फांदी पानांत बघत डोळे
डोळ्यांत झाड लवुनी स्वर मंद धुंद बोले
गोऱ्या तुझ्या कराने देऊन दाद तुजला
कमनीय अंगुलीने छेडून तंबुऱ्याला
मधुकंस... तोडी... काफी ... तव आर्त
भैरवीनें
तल्लीन झाड डोले, मन चिंब गौरवाने
गजरात मुक्त टाळ्या वर्षाव सूर भिनले
तव केतकी–तनूचे आभाळ–स्पर्श झुकले.

## विरहपावले

श्रावणातल्या हिरव्या पानफुलांच्या
शिरव्यामधुनी रजत उन्हाचा
मृदु शिडकावा निळसर... लोभस
त्या धारांवर...
जणु जावळ भुरभुरल्या थेंबांवर
लाल लालसर... का केशरमय ?
अशी उमटली नितळ पावले
अन् मेंदीची...

पहिल्या वहिल्या त्या भेटीच्या
अनोळखीशी ओळख झाल्या रात्रीमधल्या
त्या रात्रीच्या अधीरतेवर
स्वप्नफुलांची अशी उमटली
प्रीत-पावले त्या मेंदीची...

मंगळागौरी अशा सजविल्या
खेळ मांडिले नाव गुंफले
आठवणींतुन ओठांवरती काव्य उमलले

अशा नाचऱ्या यौवनगंधी वातावरणीं
त्या गंधाच्या चरणांवरती
शब्दरूप घेऊन उमटली
पदकमलांच्या नखानखांवर
त्या मेंदीची भावपावले...

चांदण्यातल्या माहेराच्या
अवतीभवती... असा गलबला...
आणि घोळका
तरी एकली... अन् एकाकी
गमे सारखे मनी मानसी
ते एकाकीपण जणू उमटले
त्या मेंदीच्या रंगखुणेतून
त्या मेंदीची विरहपावले... !

## तू दिले सारे असे

तू दिले सारे असे दाटल्या मेघांतुनी
चिंब झालो चालताना धुंदल्या वाटेतुनी

झावळ्या छायेत होता पौर्णिमेचा चंद्रमा
ओहळाला ओढ होती बाळगिली ना तमा

तू दिले सारे असे सांजकाळी झोकुनी
रंग फुलले पुलक गात्री स्वप्न ये साकारुनी

श्रावणाच्या झरत होत्या शीतधारा भोवती
ओठ हलले बोलावयाला मौन उमले अंतरी

तू दिले सारे असे यौवनी वेगातुनी
स्पर्श-गंधाच्या खुणेने... दान होते लोचनी

जे दिलेले मोल होते, विस्मरू त्याला कसे ते !
माणकांचे तेज आणि सोनियाचे वर्ख होते

तू दिले, त्यास जपले, दुःख ल्याले सौख्य वेडे
वाट धावे वेडातुनी त्या, त्यात फुलले केवडे... !

## रात्रीच्या मखमालीवरती

...आणि एकदा
आपण जेव्हा बसलो होतो
रात्रीच्या मखमालीवरती
चांदण्यातल्या मऊ रेशमी
छायेमध्ये
ओठांवरती उमलत होत्या
स्वप्न–पाकळ्या.
अंतरातला चिंब न्हाउनी
गंध सावळा.

रात्रीच्या मखमालीवरती
निर्झर होता दूर खळाळत...
वर वृक्षांच्या तरल सावल्या
दूर क्षितिजी.
निळ्या नभावर
नक्षी होती उमटत अपुल्या
एक मनाची अन् श्वासांची
अधीरल्या बोटांच्या हळव्या
अन् कातरल्या स्पर्शामधली...

रात्रीच्या मखमालीवरती
चांदण्यातल्या मऊ रेशमी
छायेमध्ये
दोन मनांचे होते कूजन... अन् आक्रंद्रन...
गुंफित होतो अपुले जीवन.
तेव्हा... केव्हा ?

कधी तरी अन् बसलो होतो
रात्रीच्या मखमालीवरती

# किती कठोर आहेस तू कलावंत !

तुझ्या अस्तित्वाची माहिती
समजते कधीतरी
आणि संसारातल्या प्रवासाच्या गमतीजमती !
किती कठोर आहेस तू कलावंत !

म्हणे, बर्फाळलेल्या रस्त्यावरती
तू सुंदर ठेचकाळलीस
धावत होतीस थंडगार... चावऱ्या वाऱ्यात...
आणि बाळाचे हात गारठले होते, वगैरे

माझ्या वाटचालीत
त्याच क्षणी होतो बर्फाचा अग्नी
आठवणींच्या ज्वालेत होरपळतो
होऊन हळवा... !

तुझ्या समवेत घालविलेल्या श्रावण-संध्या
निखळलेले श्वास...
अडकलेले भाव...
उभविलेली अधीर स्वप्ने...

मृदुल शर्वरीतील पुलकित गात्रे
अखेर सारे दूर... दूर...
तुझा कलावंत बर्फातल्या सौंदर्यावर मोहित आहे..
माझ्या भावनांच्या वेदीवर
आठवणींच्या ज्वाला धडधडत आहेत...

किती कठोर आहेस तू कलावंत !

## शोध

मी असा शोधीत गेलो फूलवेडया माणसाला
गंध कोठे भावनांचा मंद हळवा सांडलेला,
वाट गर्दीची इथे तर गच्च भरल्या माणसांची
नेत्र अंधेरून आले, जाण आली शून्यतेची,
तोच आला चंद्र भवती चांदणे श्वासांत आले
दूर क्षितिजी डोळयांतुनी तू मुग्धसे बोलावले,

—आणि मग तू रोज ओल्या स्पर्श—गंधातून न्हाली
जीवनाचा काठ माझा चिंबली होती नव्हाळी,
डोळे तुझे मधाळी डोळयांत माझ्या सूर झरले
गुंफता झंकार—बोटे उमलून गाणे नृत्य झाले,
तू अशी रंगातुनी अन् नादातुनी, गे, नजर झाली
अंतरी तृप्तीतली मम अतृप्त आहे गंधवेली !

## पत्र

पत्रातल्या तुझ्या त्या बोटात चंद्र ओला
तव स्वाक्षरी, शपथ ती... आश्वासनात झरला

बकुळी फुले विखरुनी गंधात ओळ लिहिली
ओळींतुनी पुढे मग साकार होत गेली

बोलके डोळे तुझे ते, ते ओठ छंद–पक्षी
पसरून पंख म्हटले; 'हा चंद्रच आहे साक्षी !'

मग तू किती लिहिल्या ओळी फुलाफुलांच्या
भेटीत होत गेल्या पक्क्या खुणा नभाच्या

एकांत वाटा रेंगाळलेल्या रंग क्षितिजीं बावरे
होतो प्रवासी जाहलेलो रस्ते दुव्याचे धावरे

गेल्या पुसून वाटा पुळणीतल्या तरल त्या
पत्रात मुग्धशा त्या... मौनात मूकशा त्या...

# माग

चाफ्यातल्या गुन्हयाने रक्तात फसत गेलो
तव धावऱ्या मनाचा मी माग होत गेलो

पायांतले ठिबकणे मी चंद्र होत गेलो
क्षितिजावरी पुन्हा मी... मी मावळून गेलो

अंधार-गंध माझ्या श्वासात फुलत गेलो
तव आठवात ठेचा मी वेदनेत रमलो

चकवून तू पुन्हा मी मार्गात अथक झुकलो
तव पावले ठशांची हातांत धरत गेलो

मी पार या जगाच्या अवकाशशून्य झालो
या चक्र-तारकांचे कण वेध घेत गेलो

आता न मी न माझा, मी फक्त नयन उरलो
तव मूर्त भानभिनल्या मी आकृतीत उरलो !

## पाठमोर

घेऊन हात गोरा माझ्या पुढ्यात केला
टक लावत्या तुझ्या त्या डोळ्यांतला अबोला
आभाळ दाटलेले कमनीय काळ झाला
क्षितिजावरी उराच्या रंगांत गंध न्हाला ...

दाटून भाव आला ना बोलता खुणेला
बेभान मी, न कळले, स्वर आर्त होत गेला
काही न, काय होते, कळले क्षणाक्षणाला
आभाळ भारलेले तृप्तीत सूर ओला ...

चाफ्यात तू म्हणाली– हातात घेतलेला
हिरवा सुगंध गेला रक्तात भाळलेला
कलत्या क्षणात माझा आवेग मंद झाला
होऊन हात गोरा मग पाठमोर झुकला... !

## ज्ञानेशाची बैठक

मी पाहियली ज्ञानेशाची बैठक,
जेथे ज्ञानेशांनी लिहिला
अपुला भाव मनातिल...

त्या दबडाला होती त्यांची
पाठ कोवळी
मुक्ताईला जिने दाविल्या ज्वाला
ज्वाला कसल्या ? छळवादच तो
परंपरेचा... रूक्ष रुढीचा
कर्मकांड अन् गोठुन गेल्या मनामनाचा...

मी पाहियली ज्ञानेशाची बैठक
स्थिरावलेले त्यांचे डोळे
भाव कोवळे...
उमलुन आले होते चरचरातिल
विशाल विश्वामधले
सौंदर्याचे अंकुर हिरवे
शब्द, स्पर्श, रूप... रस आणि गंध...
होते सारे दरवळलेले...
मयूर भवती नाचत
अमृतसरिता वाहत
पक्ष्यांची किलबिल नाजुक
परतत्त्वाचा होता जेथे
स्पर्श अमूर्तसा...

लुसलुशित कोवळ्या
शब्दांचा होता पारिजात बहरला...
होते श्यामल रूप भोवती
भक्तांच्या मेळ्यामधुनी...
प्रसन्न, तृप्त... मनामनांतुनी...
भक्तीचा देहच झाला होता मूर्त... गंधमयी

मी पाहियली ज्ञानेशाची बैठक...
आणि विसरलो क्षणभर माझे
माझे जग भवतीचे,
जेथे होता स्वार्थ सदोदित
स्पर्धा होती मारक मानवतेला
आणि गतीची धाप जिवांना
अण्वस्त्रांचे होते साठे
किंकाळ्यांनी भरले होते आसमंत अन्...
प्रेतांचे सांगाडे...

हे विश्वचि माझे घर, असे वाटले मजला
दुरितांचे सरलेले तिमिर
जो जे वांछील, ते ते लाभे सारे...
भवतीचे सारे गेलो विसरून
उन्मन झालो,
मी पाहियली जेव्हा ज्ञानेशाची बैठक...!

## रंग आज जीवनात

पाणकळे चाळिस मी
ओलांडुन येथे उभा
अजुन खिळे दूर निळी
नजर आर्द्र स्वप्न नभा...

रंग किती खुललेले
मायेचे शैशवपण
यौवनातल्या उषेत
हुरहुरले मोहक क्षण...

रंग किती भुललेले
बकुळीचे ... चाफ्याचे...
शीतलशा निर्झरात
चांदण्यात श्वासांचे...

रंग किती गहिरेसे
वत्सलशा हातांचे
खेड्यातिल उघड्यावर
मंथरशा वाऱ्याचे...

रंग किती शपथांचे
ओठांवर खंतीचे
ताटातुट यौवनात
तरिही ते तृप्तीचे...

रंग असे भावांचे
संसारी रमण्याचे
तरल स्मृती आठवून
रंग असे भिजण्याचे...

रंग आज जीवनात
विविध पोत विणलेले
रंग किती खुललेले
रंग असे भिजलेले... !

## व्यवहार

रोजचीच वाटचाल
ठराविक वळणांत
घेत वळणे दुचाकी
धावे बधिर यंत्रात...

आता वाटेला कुठली
कशी फुटावी पालवी ?
रंग, गंध विटलेले
उधळण कशी यावी...?

आवेगाने उमलाव्या
नजरेच्या कळ्या कळ्या
भोळ्या अधीऱ्या जीवाला
स्पर्श करीत पाकळ्या...

ओल्या चिंब भावनांचे
उधाणल्या यौवनांचे
रूप जगाचे सुंदर
आता फक्त स्मरायाचे ! !

स्मृतीचेही रंग आता
लागलेत उडायाला
धावे बधिर दुचाकी
व्यवहार गाठायला !

## वाटचाल

ओझरता स्पर्श हळू
भाव असा उलगडला
संध्येच्या थरथरत्या
समिरांवर कुजबुजला

झिळमिळली पायवाट
पाउल ते अडखळले
स्वप्नांच्या वेलीवर
गंधफूल दरवळले

अंधारी रात्र कशी
अडवाया अडथळली
पण पहाट होती ना
गंधवती ती ओली

अजून वाट किरणांची
धवल गूढ आशेची
तिमिरांकित वाटचाल
अजून ही सरायची...

## पायवाट

पायांत वाट मी माझी घेउनी निघालो
भवती निसर्ग माझ्या हिरव्या जगात न्हालो...
मातीत नाचलो मी रुजवून शैशवाला
मायेत गंध वेडा वात्सल्य सोबतीला...

तारुण्य–भावनांनी रूपात रंग भुलला
तो मुग्ध... मूक होता पर्जन्य–स्पर्श ओला
विरहातल्या क्षणांनी आभाळ-मीलनाला
उधळून देत होतो चंद्रातल्या झऱ्याला...

गांभीर्य जीवनाचे रेषा समोर होती
घरकूल गोड झाले, नजरेत शांत तृप्ती
या सान्त द्वैततेला अद्वैत दूर खुणवी
पायांत वाट माझी... वाटेतुनी सरावी...

# माझं हरवलेपण

माझं हरवलेपण आता आकाश–तुकड्यात
आभाळभरल्या पाखरांची गतिमान निळाई
गर्द हिरव्या सावल्यांच्या झावळीतून वाहणारा
निर्झर...
मऊशार गवतातून धावणारी, मोडलेले काटे
काढत
मुक्त संचार करणारी अनवाणी पावले... !
गाई–बैलांच्या उंच शेपट्यांच्या मधून
चौखूर उधळणारं माझंपण
धाब्याच्या पांढऱ्या मातीत मिसळलेलं गोरं
चांदणं
रोमांच उमलवणाऱ्या गोधडीत ठेवून
पहाटेच्या काळसर... तांबड्या रंग-गंधात
घुसमटवून टाकणारं अनोखी अस्तित्व
चैतन्याच्या उन्हात न्हात... करपवत...
गडद सोबत करणारं माझं रगेल मीपण
हरवून बसलोय्...

झाकोळलेल्या आभाळसावलीत
इकडे तिकडे बंद दारांची क्षितिजे
खिडकीत अडखळणारे आकाश
माझं हरवलेपण आता आकाश-तुकड्यात...

## शांती

मी शांती...!

विश्वाच्या उत्पत्तीच्या अनंत अवकाशात
भरून मंद्र स्वरात
सप्त रंगांतून अलगद हळुवार उलगडणारी
गंधात पाकळ्यांच्या मखमलीतून दाटत
सळसळणाऱ्या मंथर वाऱ्याच्या
दूरवर मऊ मातीच्या कणाकणांत
पर्जन्याच्या धारेतील थेंबांतून नाचत
प्रशांत सिंधूच्या क्षितिजापार फेसाळत
पक्ष्यांच्या पंखांतून झेपावत चोचीत
झाडांच्या पानापानांतून झिरपत–निथळत
जंगलातून निबिडतेत डोकावून डरकाळ्यांत
आदिमानवाच्या निरागस ताज्या हास्यात
शृंगारात उत्कट मिठीच्या मनातून
महात्म्यांच्या पावलांत घुटमळत
जीवनाला स्पर्शत–, मी शांती...!

कृष्णाच्या शिष्टाईत विसावत
येशू ख्रिस्ताच्या क्रॉसमध्ये अडकत
महंमद पैगंबराच्या महान वाटचालीत

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

बुद्धाच्या धर्मचक्र–प्रवर्तनात
महावीराच्या आकाशाएवढ्या
नितळ व्यक्तित्वात
गुरू नानकाच्या सोन्यात तावून सुलाखत
अब्राहम लिंकनच्या स्वातंत्र्य-स्फूर्तीत
गांधीजींच्या आश्रमातून वावरत
विनोबांच्या जय जगत् पदयात्रेच्या दानात
मार्टिन ल्यूथरच्या सत्याग्रही मोर्च्यात
इस्राएल... इजिप्तच्या वाळवंटातील ओलाव्यात
मदर तेरेसाच्या झोपडीतून थांबत... स्थिरावत...

मी शांती...!

# तुमच्या होतेपणाची खूण

महात्माजी,
आम्ही तुमचा फोटो पाहतो.
तुम्हांला पाहिलेले लोक म्हणतात,
'तुम्ही होता ...'

तुमच्या ओठांवरचं ते सुप्रसिद्ध हास्य
माणसांना जिंकणारं
मानवतेला उमलवणारं
लोक म्हणतात,
'आम्हीं उमललो होतो...'
तुमच्या सत्याग्रहाच्या संग्रामात
सारे तुरुंग भरले होते
अडाणी... ज्ञानी माणसांच्या मनात
स्वातंत्र्य फुलले होते.

महात्माजी,
तुमच्या सात्त्विक संतापाने
सैतान नमत होते
तुमच्या उपोषणाने
कठोर अन्तःकरणे विरघळत होती
तुम्हांला पाहिलेले लोक म्हणतात,
'गांधीजींची पदयात्रा
पुण्यमयी दांडीयात्रा
आम्ही पाहिलेली आहे...'

महात्माजी,
तुमचा श्वास लोकांनी ऐकला आहे.
ज्यात अहिंसा होती...
तुमचे हात पाहिले आहेत.
ज्यांत श्रमप्रतिष्ठा होती...
तुमचं मन पाहिलं आहे,
ज्यात अपरिग्रह होता...
तुमचे डोळे पाहिले आहेत
ज्यांत सत्याचा प्रकाश होता...
तुमची वाटचाल पाहिली आहे
मानवतेच्या स्वप्न-क्षितिजाकडे धावणारी...
चारित्र्य आणि पावित्र्यच जणू
साकारलेले...
तुम्ही, महात्माजी,
आम्ही तुमचा फोटो पाहतो,
तुम्हांला पाहिलेले लोक म्हणतात,
'तुम्ही होता...'

तुमच्या होतेपणाची खूण,
महात्माजी,
इथे दिसत नाही...जाणवत नाही...
आम्ही तुमचा फोटो पाहतो
आणि तुमची हिंसा आठवते
आणि हिंसाच आठवते

केनेडीची हिंसा... मार्टिन ल्यूथरची हिंसा...
आम्ही तुमचा फोटो पाहतो
असत्याच्या अंधारातून...
तुमचा उघडा देह पाहताना
अवती भवती बांधलेल्या
भपक्यांचे इमले पाहतो
आम्ही तुमचा चारित्र्यसंपन्न फोटो पाहतो
आणि कानांवर शीलभ्रष्टतेच्या किंचाळ्या
आदळतात

महात्माजी,
तुमची दयार्द्रता... तुमची काटकसर...
तुमचं स्वावलंबन...तुमची कमालीची स्वच्छता...
तुमची विश्वाला कवेत घेणारी करुणा...

महात्माजी,
आम्ही तुमचा फोटो पाहतो
तुम्हांला पाहिलेले लोक म्हणतात,
'तुम्ही होता...'
तुमच्या होतेपणाची खूण,
महात्माजी,
इथे दिसतच नाही... जाणवतही नाही..,

## गुलाब फुलले

तव लाख स्मृतींचे
अजून ताजे
गुलाब फुलले मनामनांतुन
मानवतेचे मूर्तिमंत तू रूप घेऊनी
हिमालयाच्या सौधावरुनी
शांतीचा शुभ शुभ्र मंत्र तू
पंचशील नभ व्यापुन अवघ्या
दिला जगाला...
दिव्यत्वाची... माणुसकीची
चैतन्याच्या प्रसन्नतेतिल
प्रेमाच्या वर्षेतुन न्हाली
मने आमुची...
शरदामधले उमलुन यावे
मुग्ध चांदणे
अजुन मुलायम अमृत ठेवा
तुझ्या स्मृतींचा गंध गुलाबी
दरवळणारे दान तुझे ते
शीर्ण कधी ना, अरे, व्हायचे
तव लाख स्मृतींचे
गुलाब फुलले मनामनांतुन...

# संपूर्ण क्रांतीच्या ज्वाला

आभाळाचे मनपंख झेपावत
तू उतरलास
या सुजलाम् सुफलाम् भूमीवर
होती ' इतस्ततः विखुरलेली '
तशी शहाणी
पण आपल्यालाच हरवून बसलेली
लक्ष लक्ष माणसे...!

तुझ्या पंखांखाली मायेच्या
वत्सल आर्द्रतेचा वर्षाव करीत
स्वतः किती सोसले, याची वाच्यता न करता
तू कर्मयोगी बनून वाजवलास पावा
मनामनावर सूर छेडून
चैतन्याच्या वर्षावात जिवंत केलेस या भूमीला...
तुरुंगाच्या भिंतींचा अंधार चिरून
क्रांतीच्या मशालीनं
सत्य...अहिंसा...मानवतेचे लाविलेस तू दीप...
विश्वाच्या क्षितिजावर तुझ्या इंद्रधनुष्याच्या नजरेने
द्वैताला अद्वैतात मिसळलेस...
समतेच्या विविधरंगी स्वप्नात

तू पाहिलास...
संपूर्ण क्रांतीच्या सत्याचा यज्ञ धगधगत्या ज्वालेत...
आकारताना दिसल्या तुला महामानवाच्या
अन्तःप्रेरणेच्या प्रशान्त शलाका...
दूरवर तू आता झेपावलास
सान्ताच्या पलीकडे...
अनंताच्या आभाळाला
आभाळमन देण्यासाठी...!

## डॉ. मार्टिन ल्यूथर किंग

तो सज्जात उभा होता
शांतपणे...
या अशान्त क्षुद्र मानवाला
शांतीचा संदेश देणारी
ती शान्तीची अवतरलेली
मूर्त प्रतिमा होती...
मानवी हृदयांत शोध घेणाऱ्या
त्याच्या डोळयांत शान्ती तरळत होती...
त्याच्या चालण्यात शांती होती.
बोलण्यात शांती होती.
मोर्च्यातील अग्रभागी असलेल्या आवेशातही
शान्तीची अभिव्यक्ती होती...
मानवी हक्कांच्या न्याय्य मागणीचा मंत्र त्याच्या मुखात होता
'काय भुललासी वरलीया रंगा'
हा चोखोबाचा टाहो
त्याच्या नसानसांतून गुदमरत
अंतरींच्या 'गौर' रंगाला आवाहन करीत होता.

तो सज्जात उभा होता
शान्तपणे...
(म्हणे, मानवाने त्याला शांतीचे नोबेल प्राईज दिले होते.)

—आणि त्याच्या मानेत
गोळी घुसली...
हिंसेनें अहिंसेचा...
अशान्ततेने शान्तीचा
'गोऱ्या' ने 'काळ्या' चा
क्षणार्धात खून केला होता

मृत्यूला त्यानें शांतपणे मिठींत घेतलें
मूकपणे...निःशब्दपणें...
मानवी मायेचा आसरा शोधण्यासाठी
शांतीचे रहस्य उलगडण्यासाठी...
मृत्यूच्या मांडीवर त्यानें समाधी घेतली आहे.

चंद्रावर झेपावणाऱ्या मानवाला
आपल्या हृदयात चंद्र आणता येईल का ?

## काफिला

गेला निघून कोठे, मी काफिल्यात नाही
आकार देत होतो स्वप्ने उरात काही
म्हटले सुरात तेव्हा आजीव साथ आपुली
शपथा मनात होत्या स्वप्ने थरार फुलली
ऋतुचक्र पावलांचे वाटेवरी विरावे
अंधार चांदण्याचे कधि आग ऊन प्यावे
तृप्तीत दोन गोष्टी विश्रब्धसे झरावे
भारून धर्मशाळा बेहोश होत जावे...
ठावे न, काय झाले, वाटा मलूल झाल्या
स्वार्थात स्वप्न–तुकडे वाटा फुटून गेल्या
मी बावरा उभा या वाटेत स्तब्ध राही
गेला निघून कोठे, मी काफिल्यात नाही

## चाफा

चाफा दिलास हिरवा गंधात क्षितिज झुकले
रंगात नाहताना आकाश पंख झाले
तव पापण्यांत मिटली स्वप्ने फुलून आली
स्पर्शातल्या कळ्यांची किल्बील मस्त झाली...

वारा पिऊन मग त्या वाटा वहात होत्या
रेशीम–पावलांच्या कविता लिहीत होत्या
एकात चंद्र गेला गोंदून भाळ–रेखा
ओली पहाट होती साक्षीस मुक्त हाका...

दाही दिशांत होती ती संमती अनोखी
मग मुग्ध कुंतलांच्या उरल्या निवांत नक्षी
विरल्या ओहोळ ओढी जल तृप्त सांद्र गाती
जुळल्या सतार–तारा छेडीत मंद्र नाती...

चाफा दिलास हिरवा गंधात गीत गाती...!

# घरटे

नव्हते मनात जेथे, नाते तुटून गेले
नभ वाहत्या झऱ्याचे पट्टे सफेद उरले... !
माथ्यावरी विलसत्या त्या चंद्र–सावलीला
गेल्या झळा उन्हाच्या जाळून शांततेला...
या स्वस्थशा मनाला आधार सोबती, ते
निखळून खांब पडले, नाते भुईत होते...
ओसाडशा दिशा, हे माळरान उघडे
आता भकास दिसते आकाश मुग्ध वेडे...
स्वर दूर पांगलेले पंखांत साठलेले
चोचीत भिजत होते मायेत आर्त ओले...
काड्या विणीत गेलो, श्रद्धेत बांधले मी–
घरटे, कुण्या कराने पाडून पोरका मी...
नव्हते मनात जेथे नाते तुटून गेले
घरटे कुण्या कराने पाडून टाकलेले... !

# डोळे

तव धावरे अढळ ते होते मधाळ डोळे
टक लावुनि न केव्हा, केव्हाच नाही लवले
सूर्यास्त जाहलेला गुंफून हात हाती
पायांत वेंधळी ती उधळे मवाळ माती...

फिरलो किती कितीशा रात्रीत धुंद ओल्या
चंद्रात चालताना शरदृ[illegible] शांतलेल्या
कलत्या क्षितीज–रेषा खांद्यावरी निवारा
जन्मात जन्मलेला तू, मी नि संथ वारा...

नाते असे असे ते शब्दांत माववेना
निथळे पुन्हा पुन्हा ते नयनांत वाचताना
आवेग धावताना किती खोल खोल विरला
डोळ्यांतली समाधी...अद्वैत... काळ नुरला... !

## दोन वर्षं

'माझं जर चाललं असतं,
तर मी थांबले असते–
दोन वर्षं...'
एवढंच... एवढंच...
घुसमटून म्हणालीस तू...

–आणि तुझ्या मनाच्या
अथांग डोहातून
एक हिरवे शिरवे
माझ्या रक्तकणांत शिरले
त्याला फुटलेले अंकुर–धुमारे
अजून गात आहेत
तुझ्या डोहमनातल्या अमूर्त तृप्तीचं
अतृप्त भावगीत... !

## सत्यात नाही आले—

‘ सत्यात नाही आले– स्वप्नात येऊ का, रे ?’
गाऊन तू मनीचे कथिलेस गूज सारे
स्वर एक एक गेला कापून काळजाला
बेभान गात शिणली तव गात्र गात्र वेला...

देहातले तुझे ते चैतन्य धावणारे
विखरून टाकले तू जळते जणू निखारे
अस्तित्व कोळशाचे सारेच शून्य झाले
म्हटले पुन्हा पुन्हा तू : ‘ सत्यात नाही आले. . .’

स्वप्नात धावुनी मी, स्वप्नात वाट बघतो
सत्यातला व्रती मी, आसक्त आज जगतो
जगण्यातल्या खुणेशी थांबून दूर क्षितिजी
स्वप्नातल्या जगाशी नाते न, तू न माझी . . . !

## स्वरचित्र

तुझ्या व्यक्तित्वाच्या रंगलहरी
उतरतात हळुवार–
आठवणींच्या नितळ खुणेतून

माझ्या मनाच्या मनावर...
तुझ्या शब्दांच्या ग़ंध–स्वरावर
पुन्हा एकदा ऐकू येते
शपथेचे भावगीत...

हळू हळू वियोगाचा
झाकोळून येतो अंधार.

आशेच्या दुनियेतील हे स्वरचित्र
अचानक थांबले...
जेव्हा मनाची कवाडे
बंद केली गेली...

खोलवर जगण्याच्या अवकाशात
आता भरून गडद
घुसमटणारा हा अंधार...!

## स्वप्नातल्या प्रकाशी ...

स्वप्नात चालताना स्वप्नात हासतो मी
स्वप्नातल्या प्रकाशी दाटून येत ऊर्मी
वाऱ्यावरून येते गंधात लाट हळवी
स्वप्नात बावरा मी,डोळयांत तू फुलावी..

माळून तव गुलावी येणे स्वरात होते
पुळणीत पावलांच्या होते खुणेत नाते
कलत्या नभातला तो घेऊन चंद्र स्वप्नी
उमलून वाट भिजली स्वप्नातल्या सुखांनी

स्वप्नात धावताना खळता झरा खळाळे
छायेत सावल्यांच्या मन मूक होत बोले
स्वप्नात हासतो मी जपुनी मनात स्वप्ने
गाणे निळया उन्हाचे विरहात गात गाणे...!

## बंधात बांधलेलो

ओढयात पावलांची पाण्यात ह्रालचाल
स्पर्शातुनी निळाई स्वप्नात मुग्ध ताल
डोळयांत बोलताना किती धीट तोल गेला
पाण्यात पाहताना हसरा तुषार खुलला...

संध्या हळूच शिरली अंधार पेटलेला
तोलून न्हात निथळे नभ भाव कोंदलेला
केसांत गुंतलेली पुष्पे पहाट–ओली
गंधात रात्र नटली, बेहोश होत गेली...

मातीत तांबड्या ती मिसळे अबोल लाली
बोलायचे कसे ते, क्षितिजात साठलेली
वाटेत थांबुनी त्या वाटेतुनी निघालो
चालून चालताना बंधात बांधलेलो... !

## हळवी सुगंध बकुळी

हळवी सुगंध बकुळी श्वासांत सांद्र झाली
रेंगाळती बटा मग हरखून भान गेली...
मातीत उमललेल्या वाऱ्यात सांज लवली
रंगात पंचमीच्या प्रतिबिंब लाल गाली...
विरता क्षितीज लपले उधळून चंद्र साक्षी
बोटांत पौर्णिमेची होती अनाम नक्षी
रात्रीत चांदण्याची ओली पहाट झाली
दवथेंब निथळल्या त्या तृप्तीत वेड ल्याली...
डोळे खुळे ठिबकली स्वप्ने मधाळ भुलली
आभाळ विखुरलेल्या त्या कुंतलात धाली...

हळवी सुगंध बकुळी श्वासांत सांद्र झाली
रेंगाळती बटा मग हरखून भान गेली... !

## माझ्यातली वाट

माझ्यात वाट शिरलीं आभाळ-पंख फुलले
चोचीत रंग ओले शिंपून गंध हसले...
पाऊल उचलले मी, वाटा निवांत होत्या
कधी मेघ गुदमरावे खंती कभिन्न छळत्या...
सांभाळते अजूनी या होश पावलांना
ही वाट क्षितिजवेडी आशेत धावताना...
ओला उगा गुलाबी होता मधाळ गोरा
तो स्पर्शरंग स्वप्नी खिळल्या अनाम नजरा
आले सखे सभोती गंधीत सोबतीला
आवेग झेप पक्षी बिलगून पावलाला...
आकाश नितळ भिजलो चंद्रात नाहताना
पखरून पंखदव ते फांद्यांतुनी झऱ्यांना...

थरली कधी धुळीने डोळे चुरीत गेलो
ठेचेत सावरूनी मस्तीतुनी वळालो...
फसवून मृत्तिकेला काटे न कळे रुतले
सल वाटला न केव्हा, ठिबकून रक्त आले...

गेले निघून सारे, ते सोबती... सख्या त्या
पांदीत अडकल्या मी विझल्या अशांत पणत्या...
थकणार मी न आता बिलगून वाट माझी
आता तसा निवालो पडलीत सर्व ओझी... !

## व्रत

मी घेतल्या व्रताचा ना सोडला वसा, गे,
ते गंध आठवाचे हळवे अजून जागे
येणार ना कधीही उमलून पौर्णिमेला
माहीत सर्व होते तम गाढ सोबतीला...
मोजीत जात होतो, ते पुंज तारकांचे
वाटे, मनात दाटे, ते तेज चांदण्याचे
क्षितिजात रक्त-ओल्या रंगात भाळलो मी
गुंतून जात होतो अंधार दाट ऊर्मी...!
येईल चंद्र माझा आभाळल्या मनाचा
पाहून वाट होतो वाटेत खंत ठेचा
शपथेत नाटकाच्या, निष्ठेत अभिनयाच्या
संवाद पाठ केला, तो फक्त वंचनेचा...

नभ दूर आज आलो सरत्या क्षणांत स्मरते
तव श्वास कुंतलाचे अधरांत नजर मिटते
घेऊन पाय माझे खांद्यांवरील ओझे
मी घेतल्या व्रताने- कोरीत शिल्प माझे... !

## जीवन

रस्त्यात धावताना रक्तातल्या व्यथेने
घामात चिंब न्हालो, डोळयांत शून्यतेने
ऐटीत जीवनाने ऐटीत पोज घ्यावी
पुढच्या क्षणात ठेचा अपुले विरूप दावी...

सौंदर्य पाहताना हळव्या मनी धरावे
निखळून बोचणारे काटे करी उरावे
माथ्यावरी उन्हाने श्वासांत प्राण यावे
प्राणात पाहताना उधळून दान द्यावे...

दानात होत थट्टा साशंक नयन भवतीं
कोणा न मोल कळले मम भावनेत प्रीती
विष–डंख दिसत होता त्या प्रेम–केतकीला
तरिहि सुगंध होतो वाटीत या जगाला...

हातांत गंध माझ्या या भाबड्या मनाचा
समजून घेत सारे आधार संयमाचा
या गूढ जीवनाचा धागा न मूर्त अजुनी
ही वाटचाल थांबे–थांबून आसवांनी...

## रस्ता

मातीतला हा मस्त रस्ता, होता कसा बेहोशला
पाखरांच्या आकाशगामी स्वैरतेने धावला
एकांत होता, वाट छोटी, खंदकाने झाकलेली
डोळे पहारा गुंतलेले रस्ते उभे भोवताली...

पायांत मेंदी, चंद्र ओला उमटला चिन्हांतुनी
गुंफल्या बोटांत रस्ता झाकून डोळा पापणी...
या इथे रस्त्यात होता चाफा तुझ्या हातांतला
वेदनेचा नयन साक्षी गंध दुखरा खंतला...

श्रावणी शिरव्यात झिमता कुंतली ओथंबला
पश्चिमेच्या कलत्या दुपारी अंतरंगी शांतला...
हुंदक्यांनी या वडाच्या झाडांतुनी तो चिंबला
वाहत्या पाण्यात विरला पायरस्ता आपुला... !

## क्षणअर्घ्य

उमलून पौर्णिमेला क्षण चंद्र भाळलेला
अंधार वाट विळखा श्वासांत क्षीण ओला...
मृदु मोगऱ्यात हिरवा हातात गंध गोरा
कर घेतला क्षणाने मोहून छळत वारा...
साडीत धावऱ्या त्या किरणांत शुभ्र पक्षी
गेली उसून केव्हा क्षण मुग्धतेत नक्षी...
केला चहा दुपारी, डोळ्यांत भिजत तृप्ती
क्षण एक एक उरली ओल्या कपात खंती...
आभाळ साक्ष ढळली उधळून रंग मेंदी
बोटांत गुंफलेली रक्तात मुग्ध धुंदी...
ओवून ऊर्मी क्षण ते दव-थेंब माळ केली
विखरून या इथे अन् देऊन अर्घ्य गेली... !

## पारव्यांची रांग आता

ठिबकले ज्या ठिकाणीं डोळे तुझे आकाशभोळे
अमृताचे आज तेथें वाहते पाणी खळाळे
चांदणे धुंदीत न्हाते गात गाणे भाळण्याचे
मध्यरात्री ढाळणाऱ्या गुंतलेल्या आसवांचे...

मंद वारे... स्तब्ध तारे, वृक्ष खिळल्या पावलांनी
झिंगुनी घोट घेती खंत भरल्या भावनांनी
नाद झरल्या त्या खळाळी तीव्र भुलल्या चुंबनी
उमटलेली म्लान चिन्हे विकल हसती वंचनी...

काठ भिजतो हुंदक्यांनी ऊर भरल्या श्रावणी
दूर हिरव्या थिजत रानी गोठल्या रक्तातुनी
पारव्यांची रांग आता पेरते आभाळ डोळे
अमृताचे घोस भोळे वाटभरल्या गंधले...!

## निरोप

तू घेतला क्षणी त्या माझा निरोप सगळा
डोळे लवून फिरला अंधार–सूर्य भोळा
घडले असे कसे हे, भवती प्रकाशरेषा
एकेक मिटत गेली उमलून गंध–आशा...

पाठीवरी तुझे ते घेऊन आर्त डोळे
रस्त्यात पावलांनी मातीत सुन्न छळले
सरली न वाट अजुनी, ओझे रुतून बसले
श्वासांत सावल्यांची तृष्णा विषण्ण चाले...

रस्ते कधी न आता जुळतील, दूर प्राची
पायांत आग ओली शरदात चांदण्याची
माझे मिटून डोळे – डोळे तुझे शराबी
रक्तातल्या खुणा त्या आहेत बेहिशेबी...

बेहोश होत असता आवेग धुंदलेला
तू घेतला क्षणी त्या माझा निरोप सगळा... !

## तुझं थांबणं

तू थांबणार होतीस ना माझ्यासाठी ?
शरदातल्या चांदण्यात
चाफ्याच्या गंधात दरवळणार होतीस ना ?
तू जाताना बकुळीची माळलेली फुलं
कशाला दिलीस मला ?
तो गंध रोज घुसमटवून टाकतो !
चांदणं आता विरत चाललं ना !
विरलेल्या धूसर चांदण्यात, दूरवर क्षितिजात,
उगवताना येशील का चाफ्याचा रंग उधळत,
तू थांबणार होतीस त्याची विस्कटलेली वाट घेऊन ?
त्या विस्कटलेल्या वाटेचे आता पान न् पान
मनातल्या शिशिरात जीर्ण शीर्ण भिरभिरेल ना !
त्यातच मी शरदातल्या चांदण्याचं थांबणं पाहीन
आता एवढीच अपेक्षा आहे : तुझं थांबणं बघण्याची
विरलेल्या चांदण्यात मावळताना
तुझं प्रकाश-गीत गात गातच संपेन, म्हणतोय् मी
समाधानात... !

## पत्रं

ही तुझी पत्रं
ओळीओळींच्या डहाळीवर बसून
तुझे आभाळ भरलेले मधाळ डोळे
अजूनही टक लावून बसली आहेत
आपल्या निःशब्द शपथांच्या भिजल्या पंखांनी
विसावली होतीस ना तू भाळस्पर्शाने
माझ्या सर्वांगाला गंधभाराने भारून
कुंतलातल्या खोल काळोखी अवकाशात
बुडताना दोघे आपण
भिजलेल्या ओळीओळींतल्या अक्षर–डोळ्यांचा
एकटक चिवचिवाट
आपल्या पंखांची फडफड झेपावलीच नाही आभाळात!
ही तुझी पत्रं... !

# भेट

मी भेटता तुला क्षण संपूर्ण खिन्न हसली
उपचार बोलण्याचा उत्साह... हालचाली...
डोळयांतुनी पुन्हा तू डोळयांत साठलेली
वाऱ्यात तरलतेने श्वासांत मुग्ध झाली...

होऊन स्वागतार्थी मृदु बावऱ्या मनाने
माहीत सर्व होते, तरी बोलली नव्याने
लपवून सर्व काही घाईत चतुरतेने
अन् वेदना विरावी सांगून मूकतेने...

ढळल्या नभात गाणे स्वर तीव्र छेडलेला
आकाश–साक्ष होती शिशिरात चंद्र शिरला
अंधार दाटलेला गंधात गहिवराने
डोळयांत पाणी खळले हास्यात संयमाने...

मी भेटता तुला क्षण संपूर्ण खिन्न हसली
उपचार बोलण्याचा उत्साह... हालचाली... !

# पाऊस

आभाळ कोसळे पाऊस झरत
सरींत संगीत लयीत नाचत
दान हे कुणाला–कुणाला द्यायचे ?
शेतात, मातीत...नादात घ्यायचे...
हिरवा अंकुर डोळ्यांत आकाश
क्षितिज नजर तरल प्रकाश
जोडायचे पुण्य तृप्तीत धरती
न्हायचे स्पर्शात थरारती मस्ती...
मस्तीत वळसे... वळणे वेगात
झाडांना हसत घेऊन कवेत
वेलींच्या अंगात थंडीत शिरत
आभाळ कोसळे पाऊस झरत...
झरत पाऊस निळाई नितळ
कंठात पक्ष्यांची कातरशी शीळ
पान पान खुले यौवन झुरत
सरींत संगीत लयींत नाचत
लयींत नाचत डोकवे मृदुल
आकाश–पृथ्वी मीलन सफल... !

## आली अशी

आली अशी अशी तू उमलून आर्द्रतेने
थांबून मेघभरल्या ओथंबल्या मनाने
खांद्यावरी तुझा तो माथा सुखावलेला
मधथेंब भाव ढळला चंद्रात शांतलेला...

नयनांत मौन सुटले गंधात बांधलेले
आवेगल्या मिठीने हातांत गुंफलेले
अर्पून ते तुझे ते सर्वस्व तरल थरते
अद्वैत गात ओले तृप्तीत न्हात होते...

मऊ पावलांत कलले, आभाळ नितळ झाले
झाडात पान सळत्या पक्षी उडून गेले
पंखांत ऊब उडत्या कंठात रुळत गाणे
आलीस आर्ततेने उमलून आर्द्रतेने... !

## अस्वस्थ, शांत खोली ...

होती दुपार ढळती, अस्वस्थ, शांत खोली
एकांत भंगलेला, एकाग्र तव अबोली
दारात थांबलेला अतृप्त खंत वारा
वाटे न वृक्ष फुलला तृप्तीतला निवारा...

दृष्टी अधीर होती, रस्ताच नयन झाला
पुळणीत झेप ओली, मृग आर्त फसत गेला
धापेत आकृतीला आकाश बांधलेले
खिडकीत सावल्यांनी दाटून क्षितिज आले...

ग्रीष्मात वादळाने वेगात भरभरूनी
पाऊल टाकले तू मेंदीतुनी भुलूनी
बाहेर–आत भरल्या धारा भिजून ओल्या
तृप्तीत शांत खिडक्या खोलीत क्लान्त झाल्या... !

## साशंक

साशंकशा क्षणांनी आलीस मुग्ध ओली
आवेग स्वप्न भुलत्या गंधात भ्रांत भोळी
डोळे तुझे खुळयानें डोळयांमधून थरले
चंद्रात चांदण्याचे अद्वैत आर्त झुकले . . .

श्वासांत चाललेला संवाद मूक बुजरा
होऊन धीट धुंदी ओठांत धीर हसरा
सांगायचे युगाचे नाते मनात जुळले
आकाश मुक्त होते शपथेत रक्त न्हाले . . .

रक्तात मंत्र आता प्रीतीत ध्यास गहिरा
आश्वासनात छाया बेभानला निवारा
बाहेर–आत गाती पडसाद तृप्ततेचे
आता घुमावयाचे स्वर खोल शांततेचे . . . !

## वादळ

होतो मी यात्रेत दाखल दिंडीत
माझिया मनाची नजर टाळत
कंठात आवाज गर्दीत घुसून
विसर पाडत पहाट होऊन...
तरीही एकांत एकाकी गाठून
छळत सतत खपली काढून
छळत उरात...देहात...डोळयांत
पावले चालत रक्तात भिजत...
भोवती वादळ सुसाट घोंगावे
हाकेत कुठल्या तुजला बघावे
भिजल्या आशेने ओसाड वाटेत
कोरडया डोळयांनी चालावे पाहत...
वादळ जवळ बावरी भोवळ
सावरी पदर ओलावा शीतल
स्वप्नात बघत उघडया नभात
शांतले वादळ, उभी तू साक्षात...
वादळ होऊन आलीस थकून
विरोध जखमा श्वासांत धरून
शिणल्या देहात जिद्दीच्या मनात
सर्वस्व घेऊन जगाला सोडत...!

## ज्ञानदेव चालले

ज्ञानदेव चालले तहानल्या नजरेने
अनवाणी दिसती का भिजलेली सजल मने
तप्त इथे तिथे कसे वाळवंट तांबडे
डोळ्यांतुन फुललेले पायतळी घाव पडे...

पाठीवर भावंडे घेउनिया विश्वाला
नयन तृप्त नभ झुकल्या अंतरात आत्म्याला
लावण्य झरे चंद्रातुन गगनाची स्पर्श वेल
तेजाचे दिव्य घोस दरवळले आर्द्र बोल...

भिंत हले मोहरून ब्रह्माचे भान तिला
वेदमूर्त होउनिया रेड्यामुखी पाझरला
वाळवंट थरथरले शांत चिंब हातांनी
ज्ञानदेव वावरले मुग्ध मुक्त पंखांनी...

## विश्वास

क्षणात आलीस
गेलीस क्षणात
अस्वस्थ क्षणांना
        ठेवून हल्लक...

येताना घेऊन
सुगंध हिरवा
हातांत ठेवून
        गंधल्या खुणांना...

धावत आलीस
मेंदीत पाऊल
नाजूक नाचरे
        क्षितिज–रेषेत...

डोळ्यांनी आलीस
अधीर नजर
छातीवर माथा
        विश्वास टेकून...

हल्लक क्षणांना
गंधल्या क्षणांत
क्षितिज–रेषेत
        विश्वास पेरीत...

क्षणात आलीस
गेलीस क्षणात ...!

## डोळे

आलीस दुपारी
जराशा अवेळी
मूकशी बावरी
मुग्ध उभी...

मधाळ डोळचाने
पाहशी लोचने
एकटक डोळे
स्थिर दृष्टी...

उत्सुक हसत
कॉफीची उकळी
वाफेत पाहत
डोळे भोळे...

डोळचाने पाहत
पाहत डोळचांत
डोळचानें डोळचाशी
भिडे डोळे...

हसऱ्या डोळचांनी
वेंधळी डोळचांत
डोळे समर्पित
डोळे डोळे...

मनावर डोळे
बेभानले डोळे
डोळे सुखावले
तृप्त डोळे...!

## तहानलेले रंग

तू शांत, अस्वस्थ
श्वास–नि:श्वासांतून
रक्तात मिसळतेस, तेव्हा...
माझ्या रक्ताचे रंग बदलतात
हिरवा श्रावण पुन्हा भिजत...
जांभळ्या शेतात बकुळ–फुले वेचत...
विहिरीवरती तुझ्या गुलाबी गाण्यात...
पौर्णिमेला मध्यरात्रीच्या
दूरवर काळोख धावत...
तुझ्या गोऱ्या रंगाशी अडखळत
माझे डोळे तुझ्या डोळ्यांत डोकावतात
अस्वस्थ होत
तेव्हा माझे रक्त रक्ताळलेले असते
अंगावर रंगारंगांच्या खुणा ठेवत
मीही मग श्वास–उच्छ्वासांतून
अस्वस्थ होत
रक्तात मिसळत जातो
तहानलेल्या रंगांत... !

## वावरताना सहज

मी भेटताना
तू सहज वावरतेस
कामात दंगत
सावधतेच्या क्षणांना पायांखाली ठेवून...
डोळ्यांतून आठवत
निसटलेल्या क्षणांना
पदरात खोवून ठेवत...
काहीबाही खूप खूप
अलिकडचंच बोलतेस तू
फोडणी जरा जोरात वाजते
रवी जरा जास्त फिरते
म्हणत असते : ऑफिसची वेळ, घाईत फार
ठेवताना चहाचा कप
बावरी ओणवी थरथर
रित्या कोरड्या बशीत
ठेवतेस सावध क्षणांना
वावरताना सहज... !

# खग्रास सूर्यग्रहण

मी पाहिले माझ्या डोळस डोळ्यांनी
८२ वर्षांनी खग्रास काळ्या सूर्याला
शास्त्रज्ञांचे सारे इशारे डोळ्यांआड करून
मी बघत राहिलो तीव्र सूर्यकिरणांना

कदाचित आता अंधत्व चरत येईल
माझ्या दिसणाऱ्या डोळ्यांना अंधार-सूर्य कायम बघण्यासाठी
८४ लक्ष योनींतून मी प्रवास केलाय्
म्हणत मला मानव
मानवतेचे इशारे देत दुसऱ्यांसाठी
माणुसकीचे पाप झाकावे, म्हणून
मी दिले दान समजून सुटले गिऱ्हाण
जोडीत आलो पुण्य, असे समाधान मिळवीत राहिलो
अंधार मात्र देतच गेला नकळतपणे
अंधत्वाचे दान
आज झालेलो मी पूर्ण आंधळा मानवतेचा

अत्याचार मी करीत असतो
दारिद्र्याला वेठीस धरून
बलात्कार मी करीत असतो
नारायणपूरच्या माझ्या वासनेला मोकाट सोडून
खून मी पाडीत असतो
मराठवाड्यात जातीयतेच्या विखारी नजरेने
पारसबिघ्यात...बेलछीत
मी मुंडी मुरगाळीत असतो माणुसकीची
माझ्या तृप्त तुंदिल तनूवर
हजार डोळे आंधळ्या पुण्याचे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४८८६
दा. क्र. २३९९८
वर्ग ४५ ३१।७।९३
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)
REFBK-0023998
REFBK-0023998

मी स्नान करतो पवित्र पाण्यात पाणी न मिळणाऱ्यांच्या
भोळ्या लोकांना बनवीत जातो
भोळ्या शंकराच्या देवळात नंदीला स्पर्श करीत भेटत
अरे, मी इथे–तिथे रक्ताचे पाट खोदत गेलो
फटकारे मारून माणसांना रक्ताच्या चिळकांड्या उडवीत
सामुदायिक हत्या करीत राहिलो
धर्माच्या आंधळ्या ग्लानीत
मला तांबडे रक्त दिसलेच नाही
माझ्या काळ्या अंतश्चक्षूंना कधी जाणवलेच नाहीत
रक्ताने दिलेले इशारे...

८४ लक्ष योनींतून साठलेले अंधत्व
माझ्या मानवतेच्या डोळस डोळ्यांना दिसले नाही
म्हणून मी जेव्हा पाहिले खग्रास सूर्यग्रहण,
शास्त्रज्ञांचे इशारे डावलून ८२ वर्षांनी खग्रास काळ्या
सूर्याला
तेव्हा राहू–केतू हसत होते
माझ्या मानवतेच्या आंधळ्या डोळ्यांना...!